# ।। भक्त ऊपजे को अंग ।।
## मारवाडी + मराठी
## सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## अथ भक्त ऊपजे को अंग लिखंते ।।

।। साखी ।।

**भक्त भाव सूं ऊपजे ।। सुणज्यो सब संसार ।।**
**जन सुखदेवजी केत हे ।। सब बिध बात बिचार ।।१।।**

महासुखाची अमरपदाची भक्ती सतगुरु हेच सतसाहेब आहे हा भाव आल्याने उपजते. जो पर्यंत् सतगुरु हे साहेब आहे हा भाव येत नाही तो पर्यंत हट करुन लक्ष प्रयत्न केल्यावरही महासुखाच्या देशाची भक्ती शिष्यात कधी नाही उपजत(उत्पन्न होत)हे सर्व संसाराच्या स्त्री–पुरुषांनो कान उघडून ऐकून घ्या.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की अमरपदाची भक्ती सतगुरुच्या प्रतिभाव न आल्याने उपजतच नाही व भाव आल्यावर उपजल्याशिवाय राहत नाही हे मी सर्व प्रकारच्या विध्यांचा सखोल विचार करुन पाहिला या करीता अमरपदाची भक्ती सतगुरु हेच साहेब आहे हा भाव आल्यावरच फक्त उपजते हे सर्व जगाच्या स्त्री–पुरुषांनो ध्यान देऊन समजा. ।।१।।

**प्रथम दया बिचारीये ।। छूटे कड़वी बाण ।।**
**तो भक्ति सुखरामके ।। जद तद ऊपजे आण ।।२।।**

महासुखाची अमरपदाची भक्ती अंतरमध्ये सर्व दु:खी जीवांवर तसेच संतावर दया राहिल्यावर लवकरात लवकर वेळ येताच उपजते तसेच सर्व दु:खी जीवांशी तसेच अमरपदाच्या संतांशी कडू बोली तसेच कडू वृत्ती न ठेवता गोड बोली तसेच गोड वृत्ती ठेवल्याने लवकरात लवकर वेळ येताच उपजते.लवकरात लवकर वेळ आल्यावर भक्ती उपजते म्हणजे त्याला त्याच मनुष्य देहात भक्ती उपजू शकते.जर त्याला त्याच मनुष्य देहात भक्ती उपजली नाही तर तो जीव ८४ लक्ष योनीत न जाता जोपर्यंत त्याला भक्ती मिळत नाही तोपर्यंत तो हंस मनुष्य देहातच येवू शकतो अशी शक्यता सतस्वरुप ज्ञान समजने दिसते.असे का?तर काळाला मारणारी सतस्वरुपी संत प्रकृतीची दया तो हंस ठेवतो त्याच्यात तो संत स्वभाव प्रगटतो.(संतांवर दया कशी?–संत हे परमात्म्याचे भक्त असतात.परमात्मा महादयाळू आहे मग संतांवर परमात्माहुन अधिक जगाच्या मनुष्याची दया कशी बनेल?उत्तर–साधू हा फकीर स्वभावचा असतो.त्याला मायेच्या कोणत्याही वस्तूची आवश्यकता थोडीशीही भासत नाही.असे साधू ऊन,थंडी,पाऊस, भूक,तहान या वस्तूचा काही विचार करत नाही व परमात्माची भक्ती शुरवीरतेने वेळी अवेळी कुस्थितीत ही करत राहतात.कडाक्याच्या थंडीत,कड्क उन्हाळ्यात,खाल्ल्या– शिवाय,पिल्याशिवाय राम स्मरणात मस्त राहतात.अशा साधूला पाहून दयावान मनुष्याला त्यांच्या शुरवीरतेच्या प्रती दिव्य आदरही येतो आणि सुखात हे साधु भक्ती करु शकतील याची दयाही येते.या करीता दयाळू मनुष्य त्यांना झोपडी बनवून देतो,

थंडीपासून वाचण्याकरीता गरम कपडे पोहचवितो,उन्हापासून वाचण्याकरीता पंखा इ. ची व्यवस्था करतो,भुकेले तहानलेले राहु नये याकरीता अन्न व पाण्याची उपलब्धता करतो व साधू सहजात जास्त भजन करु शकतील व त्याला परीस्थितींचा कमीत कमी त्रास राहील अशी काळाला मारणारी सतस्वरुपी संत प्रकृतीने दया ठेवतो अशी संत प्रकृतीची दया ज्या मनुष्यात जन्मते तो संत प्रकृतीने दया ठेवतो अशी संत प्रकृतीची दया ज्या मनुष्यात जन्मते तो संत प्रकृतीचा मनुष्य मनुष्याच्या देहात जोपर्यंत मोक्षात जात नाही तोपर्यंत मनुष्य देहातच येऊ शकतो अशी सतस्वरुप ज्ञानाने संभावना दिसते. ।।२।।

**साख शब्द कूँ कान दे ।। बेसे संगत मे जाय ।।**
**तो भक्ति सुखराम के ।। जद तद ऊपजे आय ।।३।।**

कैवली संतांच्या संगतीत बसून सतगुरु ज्या कैवल्य देशाच्या साख्या तसेच शब्द वाणी ऐकवतात ते कान देवून ऐकल्यावर व ऐकल्यानंतर समज आणल्याने कैवल्य भक्ती शिष्याच्या घटात लवकरात लवकर उपजते म्हणजे शिष्याला त्याच मनुष्य देहात भक्ती उपजू शकते.जर त्याला त्याच मनुष्य देहात भक्ती उपजली नाही तर तो जीव कैवल्य संत प्रकृतीचा बनून गेल्या कारणाने ८४ लक्ष योनीत न जाता जोपर्यंत त्याला मोक्ष मिळत नाही तोपर्यंत तो हंस मनुष्य देहातच येतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३।।

**संताँ की संगत करे ।। ज्यूँ त्यूँ करके आण ।।**
**तो ऊपजे सुखराम के ।। भक्ति भेद बखाण ।।४।।**

कैवली संताच्या संगतमध्ये जाण्याकरीता आड येणाऱ्या कोणत्याही कठिणाईला न जुमानता जसे तसे करुन कैवली संताची संगत करतो.अशा सतसंगीला कैवली भक्तीचा भेद प्रगट होतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बखाण करुन राहिले आहेत.।।४।।

**हरजन के घर जाय कर ।। अन जळ करे अहार ।।**
**ईण गुण सूं सुखराम के ।। ऊपजे भक्त बिचार ।।५।।**

कैवल्य भक्तीला प्रगट करण्याचा कधी विचार नाही आला व येणार ही नाही असाही जगाचा कोणी मनुष्य हरी जनाच्या घरी जावून त्यांच्या घरच्या अन्न व पाण्याचा आहार करेल तर संतांच्या घरच्या अन्न व पाण्याच्या प्रतापाने त्या अन्न व पाणी ग्रहण करणाऱ्या मनुष्याच्या मनात कैवली भक्ती करण्याचा विचार येईल व त्याच्यात मागे पुढे भक्ती प्रगट होईल असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५।।


**आसो आदर भाव को ।। जे नर राखे कोय ।।**
**तो भक्ति सुखराम के ।। जद तद ऊपजे जोय ।।६।।**

भाग्यात कैवल्य भक्ती उपजण्याचा कोणताही योग नाही आहे असा ही जगाचा कोणताही

मनुष्य कैवली संतांचा आदर भाव ठेवेल तर भाग्य असो वा नसो असा आदरभाव ठेवणाऱ्या प्रत्येक मनुष्यात महासुख देणारी कैवली भक्ती उपजते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या स्त्री–पुरुषांना समजवून राहिले आहेत. ।।६।।

**हरजन की म्हेमा करे ।। पख खाँचे बिन छेह ।।**
**तां कूं हर सुखराम के ।। भक्ति दे इण देह ।।७।।**

हरीजन म्हणजे काळाला जिंकून रामजीच्या देशात पोहचलेल्या संताची महिमा करतो




व त्रिगुणी मायेत रचमचलेल्या व साहेबाशी बेमुख आहे अशा जगाच्या सागट लोकांच्या समोर सागट लोकांचा अती विरोध सहन करुन शेवटपर्यंत हरीजनाचा पक्ष घेतो अशा मनुष्यात हर त्याला त्याच देहात मोठ्या सुखाच्या देशाची कैवल्य भक्ती प्रगट करुन देतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री–पुरुषांना समजावून राहिले आहेत.।।७।।

**हरजन के सामो मिले ।। जे लुळ लागे पाय ।।**
**ता कूं सुण सुखराम के ।। भक्त ऊपजे आय ।।८।।**

जसे जगत विवाहात वधू पक्षावाले स्वत:ला लहान समजून वरातीच्या समोर जातात व वाकून वाकून वर पक्षावाल्यांचा आदर करतात व पाया पडतात.याचप्रकारे कोणी मनुष्य स्वत:ला साधारण मनुष्य व हरीजनाला साहेब समजून आनंदाने समोर दर्शन घ्यायला जातो वाकून वाकून हरीजनाचा आदर करतो व पाया पडतो अशा मनुष्यात हरीजनात प्रगट झालेली कैवल्य भक्ती येवून प्रगट होते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री–पुरुषांना मोठे समजून सांगतात.टिप–(वाकून वाकून पाया पडणे जसे वधू पक्षाला वर पक्षाच्या प्रती यांनी आमची मुलगी आपल्या पदरात घेऊन घेतली म्हणजे आपले बनवून घेतले आणि तिला पुढे ही फुलांसारखे सुखी ठेवतील जशी आम्ही ठेवली हा भाव राहतो म्हणून वाकून वाकून पाया पडतात,आदर करतात.ठिक असाच भाव साहेब प्राप्त न झालेल्या जीवाला हरीजन/संताच्या प्रती राहतो की संत मला आपल्या पदरात म्हणजे शरणात घेवून घेतील किंवा घेवून राहिले आहेत आणि हे संत मला काळाच्या महादु:खातून काढून साहेबाच्या आनंदपदाच्या महासुखात पोहचवतील किंवा पोहचवून देतील. ।।८।।

**हरजन सूं अड़बी करे ।। झगड़े सन्मुख आय ।।**
**ताँ घट सूं सुखराम के ।। जद तद भक्ति जाय ।।९।।**

महासुखाच्या पदात पोहोचलेले हरीजन व ज्यांच्या सत्तेने महासुखाचे पद चाहणारा कोणीही मनुष्य महासुखात पोहचू शकतो अशा संताशी जगाचा कोणताही मनुष्य अड्वी करतो म्हणजे त्याच्या कार्यात व्याधी उत्पन्न करतो व नुकसान पोहचवितो.तो संत स्वत: भक्ती

करु शकणार नाही तसेच संत कार्य चालवू शकणार नाही असा त्या संताच्या सोबत भांडतो.अशा मनुष्याचे आधी कमविलेले कैवल्य भक्तीचे सुकृत पकडून कोणतीही अन्य भक्ती सदा करीता तेव्हाच्या तेव्हा चालली जाते म्हणजे फळहीन होऊन जाते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री–पुरुषांना सांगून राहिले आहेत. ।।९।।

**भूलो चूको आण के ।। जे मेले परसाद ।।**
**या गुण सूं सुखराम के ।। छुटे बिषे जुग बाद ।।१०।।**

कोणी स्त्री–पुरुष भूलचूकमध्ये म्हणजे जगाचे लोक साधारण मनुष्यांना जसे भोजन प्रसाद ग्रहण करवितात असे हरीजनाला हरीजन न समजता साधारण मनुष्य समजून भोजन प्रसाद करवितो या गुणाने त्या स्त्री–पुरुषाचा यमाच्या दरबारात गळ्यात फाशी टाकून घेऊन जाणारे विषयरस सुटून जातात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री पुरुषांना सांगतात. ।।१०।।

**हरजन जहाँ चर्चा करे ।। जे देखण कूं जाय ।।**
**या गुण सूं सुखराम के ।। भक्त ऊपजे आय ।।११।।**

जसे जगात जगाचे स्त्री,पुरुष कोठे मायेच्या संतांचे किर्तन,प्रवचन सहज रुपात ऐकायला जातात असेच कोणी केवली संतांची चर्चा,ज्ञान समजून विचार न करता ऐकायला जातात.या गुणाने त्या स्त्री,पुरुषाच्या घटात काळाच्या मुखातून काढणारी अमरपदाची भक्ती उपजते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।११।।

**को गतीयारो होय के ।। जन कूं देखे आण ।।**
**या गुण सु सुखराम के ।। जद तद पलटे बाण ।।१२।।**

जगाचा मायेत रचमचलेला कोणी मनुष्य अनेक संख्येने संताचे भक्त संतांना पाहायला जातात म्हणून तो मनुष्य ही संतांपासून भक्ती घेण्याचा कोणताही विचार न करता गम्मत जम्मतने पाहायला जातो.या गुणाने त्या मनुष्याची त्या परमपदी संताला पाहताच तेव्हाच्या तेव्हाच मायावी मुखवाणी(बोली)पलटून संतांची मुखवाणी बनते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज संसाराच्या सर्व स्त्री–पुरुषांना सांगतात. ।।१२।।

**ले प्रसादी संत की ।। करे टेल ब्हो भाँत ।।**
**या गुण सूं सुखराम के ।। ऊपजे लिव की खाँत ।।१३।।**

कैवली संतांच्या घरचे भोजन प्रसाद ग्रहण करतो व संतांची सेवा तन,मनाने अनेक तऱ्हेने करतो तसेच रात्रदिवस संतांच्या सेवेत लिव ठेवतो या गुणाने त्या मनुष्यात कैवल्य भक्तीची विधी विधीने लिव लागते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१३।।

**हरजन की म्हेमा करे ।। जे आडो फिर कोय ।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**या गुण सूं सुखराम के ।। जद तद हरजन होय ।।१४।।**

आड्वा फिरुन फिरुन म्हणजे हरीजनाला विनंती करुन करुन हरीजनाची अंतरमधून महिमा म्हणजे उत्सव,बधावणा करतात.या गुणाने तो मनुष्य हरीजन बनून जातो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या स्त्री,पुरुषांना सांगतात. ।।१४।।

**जिण घर की सुण चीज रे ।। हरजन के अंग लाय ।।**
**या गुण सूं सुखराम के ।। जद तद जागे भाग ।।१५।।**

कोणाच्या घरची कोणतीही वस्तू हरीजनाच्या उपयोगात आणली जाते या गुणाने त्या घरच्या स्त्री-पुरुषांचे महासुखाचे कैवल्यपद उपजण्याचे भाग्य जागृत होते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री-पुरुषांना सांगतात. ।।१५।।

**संता के प्रताप सूं ।। ऊपजे भक्ति भेव बिचार ।।**
**ग्यान ध्यान सुखराम के ।। शुभ करणी मन मार ।।१६।।**

कैवली संतांच्या ज्ञान प्रतापाने शिष्याचे भ्रम मिटतात व कैवल्य भक्तीचा भेद प्रगट करण्याचा विचार उपजतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरुच्या प्रतापाने विषय रसात भिनलेले मन मरते व अमरपदात पोहचवणारे शुभ कर्म करणारे मन जागृत होते अशा संतांच्या प्रतापाने शिष्यात कैवल्य ज्ञानाची समज येते व कैवल्य पदाचे ध्यान लागते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री-पुरुषांना सांगतात. ।।१६।।

**जन के पग तळ आय के ।। जे जीव छाड़े प्राण ।।**
**ताँ कूं भक्ति ऊपजे ।। के सुखदेव बखाण ।।१७।।**

कैवली संतांच्या पायाखाली तसेच गाडी घोड्याखाली येवून प्राण त्यागतात अशा प्राणांना कैवली संतांच्या सत्तेच्या कृपेने मनुष्य देह मिळतो व त्या प्राणात कैवल्य भक्ती उपजते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगाच्या सर्व स्त्री-पुरुषांना समजवितात.।।१७।।

**ज्हाँ ज्हाँ हरजन पग धरे ।। वाँ रज जे मुख जाँय ।।**
**या गुण सुखराम के ।। भक्त ऊपजे आय ।।१८।।**

या धरतीवर जेथे जेथे हरीजनाचे पाय पड्तात अशा धरतीची रज म्हणजे धरतीचा बारीकहून बारीक कण ही कोणाच्या तोंडात जाईल तर त्या गुणाने ज्याच्या तोंडात रज पड्ली त्याला कैवल्य भक्ती उपजेल. ।।१८।।

**जन की झूटण गिरत हे ।। भूले पावे कोय ।।**
**ओ कण मुख मे जात हे ।। भक्त ऊपजे सोय ।।१९।।**

कैवली संतांच्या भोजनाच्या नंतर त्यांच्या भोजन पात्रात कधी कधी अन्न शिल्लक राहते या अन्नाला उष्टे म्हणतात.असे कणासारखे उष्टे कोणाच्या तोंडात भूलचूक मध्ये पड्न

जाते तर त्या कणाच्या प्रतापाने त्या प्राणात कैवल्य भक्ती उपजते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।१९।।

**प्रम भक्त सो ऊपजे ।। सो आ कही सुणाय ।।**
**सुणज्यो सब सुखराम के ।। साध संत सब आय ।।२०।।**

ज्या ज्या गोष्टींनी पराभक्ती उपजते(उत्पन्न होते)हे मी बोलून सांगितले तर त्याला सर्व जगाचे स्त्री–पुरुष तसेच साधू संत ऐका. ।।२०।।

**पुरब जनम मे भजन रे ।। कियो जात कूळ खोय ।।**
**ताँ कूं सुण सुखराम के ।। भक्त प्रगटे जोय ।।२१।।**

ज्यांनी जात कुळाच्या भक्त्या त्यागून मागच्या जन्मात पराभक्ती केली परंतु अपूर्ण भक्तीच्या कारणाने परमपदाला जावू शकले नाही अशा सर्व संतांना या जन्मात भक्ती प्रगटते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२१।।

**पुरब जन्म मे भक्त रे ।। भजन कियो भरपूर ।।**
**जे निपजे सुखराम के ।। मिलत चढे मुख नूर ।।२२।।**

ज्याने पूर्व जन्मात भक्ती म्हणजे रामजीची सतसंगत व भजन भरपूर केले अशा संतां मध्ये या जन्मात भक्ती निपजते व भक्ती निपजताच त्या संतांच्या चेहऱ्यावर परमपद मिळण्याचे तेज झळकते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२२।।

**अे गुण पाछे म्हे कहया ।। तेविस साख के माय ।।**
**प्रम भक्त सुखराम के ।। या बिध ऊपजे आय ।।२३।।**

मी मागील बावीस साख्या मध्ये ज्या विध्यांनी परमपदाची भक्ती उपजते ते गुण सांगितले आहेत ते सर्व गुण जगाचे सर्व ज्ञानी,ध्यानी,साधू,संत,स्त्री,पुरुष समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।२३।। ।। इति भक्त ऊपजे को अंग संपूरण ।।